महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

मंगळवार ❖ १७ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७२ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024



# हिवाळी अधिवेशन सुरू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नागपूर, दि. १६ :** विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात वंदे मातराम् व 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने विधान परिषद कामकाजास सुरुवात झाली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे पीठासीन अधिकारी होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह नवनियुक्त मंत्री, राज्यमंत्री व विधान परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

### पहिल्या दिवशी विधानसभेत ३५ हजार ७८८ कोटी रुपयांच्या पुरवण्या मागण्या

हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत ३५ हजार ७८८ कोटी रुपयांच्या पुरवण्या मागण्या मांडण्यात आल्या. यामध्ये लाडकी बहीण योजनेसाठी सरकारकडून १४०० कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली. तर मुंबई मेट्रो ३ साठी ६५५ कोटींची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. राजकोटवरच्या शिवरायांच्या पुतळ्यासाठी राज्य सरकारकडून ३६ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत पुरवणी मागणी मांडली.

- विधानसभेत मांडलेल्या पुरवणी मागण्यांत निधीची तरतूद
- सहकारी आणि खाजगी दूध संघांना प्रती लिटर ५ आणि ७ रुपये अनुदान यासाठी ७५८ कोटी रुपये.
- प्रधानमंत्री पिक विमा योजना यासाठी राज्याचा हिसा म्हणून ८१४ कोटी रुपये तरतूद.
- मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेसाठी २ हजार ७५० कोटींची तरतूद.
- यंत्रमाग वस्त्रोद्योग विज सवलतीसाठी ३०० कोटी रुपये.
- सरपंच वाढीव मानधन यासाठी १२८ कोटी.
- सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसीठी ८९० कोटी रुपयांची तरतूद.
- अदिवासी विकास विभागाला १८१३ कोटी रुपये तरतूद.
- लाडकी बहिण योजनेसाठी १४०० कोटी रुपयांची अतिरीक्त तरतूद करण्यात आली आहे.
- अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी २९० कोटी रुपयांची तरतूद.
- ओबीसी समाजासाठी मोदी आवास घरकुल योजनेसाठी १२५० कोटी रुपयांची तरतूद.
- मुंबई मेट्रो तीनसाठी ६५५ कोटी रुपयांची अतिरीक्त तरतूद.
- राज्यातील रस्ते व पुलासाठी १५०० कोटी रुपयांची अतिरीक्त तरतूद.
- इमारती, रस्ते, पुल बिनव्याजी कर्जातून बांधण्यासाठी ३१९५ कोटी रुपयांची तरतूद.
- राजयातील वैधकीय महाविद्यालयाच्या बांधकामासाठी ११७० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.
- सहकारी साखर कारखान्यांना मार्जिन मनी लोन देण्यासाठी १२०४ कोटी रुपयांची अतिरिक्त निधीची तरतूद.
- राजकोट किल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी ३६ कोटी रुपयांची अतिरीक्त तरतूद.
- लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटींची तरतूद
- लाडक्या बहिणींसाठी पुरवणी मागण्यांमध्ये १४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. लाडकी बहीण योजनेतील तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. मात्र, मासिक लाभ १५०० वरुन २१०० करण्याची अजूनही तरतूद करण्यात आली नाही.

## मंत्रिमंडळ विस्तार झाला

# खातेवाटपाचा घोळ कायम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार करण्यात आला. यामध्ये भाजपच्या १९, शिवसेनेच्या शिंदे गटाच्या ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ आमदारांनी अजित पवार यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार करण्यात आला. यामध्ये भाजपच्या १९, शिवसेनेच्या शिंदे गटाच्या ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ आमदारांनी अजित पवार यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी भाष्य केलं आहे.

'खातेवाटपाबाबत आमची चर्चा झाली असून येत्या दोन-तीन दिवसांत त्याची घोषणा केली जाईल. आम्ही सर्वसमावेशक मंत्रिमंडळावर काम केलं आहे. आम्ही सर्व समाज, महिला आणि प्रदेशांना प्रतिनिधित्व दिले आहे. भाजपचा विचार करता, आम्ही काढून टाकलेल्यांना नवीन जबाबदाऱ्या देण्याचा निर्णय घेतला आहे. खात्यांच्या वाटपाबरोबरच जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या वाटपाचा प्रश्नही प्रलंबित आहे. ही तातडीची बाब नसून ती सोडवली जाईल, असे फडणवीस म्हणाले.

राज्य मंत्रिमंडळ विस्तारापूर्वी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमध्ये गृह, नगरविकास खाते, महसूल आणि गृहनिर्माण या महत्त्वाच्या खात्यांवर चर्चा झाली होती. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला आधी गृहखाते हवे होते, तर राष्ट्रवादीला एनपीसी आवासांस उद्योग हवे होते. तसेच, संख्याबळाच्या जोरावर सरकार विरोधकांना दडपून टाकणार नाही, अशी ग्वाही



फडणवीस यांनी दिली. फडणवीस म्हणाले, 'आम्ही विरोधकांचा आवाज दाबणार नाही आणि कोणत्याही चर्चेतून मागे हटणार नाही. लोकसभेप्रमाणे विरोधकांनी केवळ माध्यमांसमोर नव्हे तर सभागृहात बोलावे, अशी आमची अपेक्षा आहे.' राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानावर विरोधकांनी रविवारी बहिष्कार टाकला. सरकारला पाठवलेल्या पत्रात ईव्हीएमच्या वापराबाबत गैरप्रकाराचे आरोप, बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यावरून परभणीत झालेला हिंसाचार आणि त्यानंतर पोलिसांनी केलेली शोधमोहीम आणि येथील सरपंचाची हत्या असे मुद्दे उपस्थित केले आहेत. बीड जिल्हा.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, 'मुख्यमंत्री एक-दोन दिवसांत खातेवाटप होईल. विरोधकांनी चहापानावर बहिष्कार टाकला. आता चहापानाचा विचार करावा लागेल. आमची संख्या जास्त आहे पण आम्ही विरोधकांचा आदर करू. बहुमताच्या जोरावर मनमानी कारभार करणार नाही. दुसरीकडे, शिवसेना पक्षप्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खातेवाटप करतील. ते तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत, त्यांचे अभिनंदन. आम्ही एका टीमप्रमाणे काम केलं आहे. आम्हीही देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, असेही शिंदे म्हणाले.

# भाजप प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण?

**चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आल्यामुळे आता भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष कोण असतील याची चर्चा सुरू झाली आहे. मंत्रिपदाची संधी मिळू न शकलेले रवींद्र चव्हाण आणि डॉ. संजय कुटे यांची नावे आघाडीवर आहेत. प्रदेशाध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. शिंदे सरकारमध्ये ते सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. कोकणात भाजपला मोठे यश मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा असल्याचे मानले जाते. तेदेखील फडणवीस यांचे निकटवर्ती आहेत. प्रदेशाध्यक्षपद मराठा समाजाला द्यायचे ठरले तर चव्हाण यांच्या नावाला पसंती दिली जाईल. जळगाव जामोदचे पाचवेळचे आमदार डॉ. संजय कुटे यांचे नाव प्रदेशाध्यक्षपदासाठी आता चर्चेत आहे. ते फडणवीस यांचे अत्यंत निकटवर्ती मानले जातात. ते कुणबी समाजाचे (बहुजन) आहेत. बावनकुळे हे तेली समाजाचे (बहुजन) आहेत आणि त्यांच्या जागी बहुजन समाजालाच संधी द्यावी असे ठरले, तर कुटे यांचे नाव प्रामुख्याने असेल.**





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्षपदासाठी प्रवीण दरेकर यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, काल भाजप नेते आणि मंत्री रवींद्र चव्हाण यांना भाजप प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी देणार असल्याची माहिती समोर आली होती. रवींद्र चव्हाण यांच्या नावासोबतच आता प्रवीण दरेकर यांच्या नावाची चर्चा रंगू लागल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. प्रवीण दरेकर यांना महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात मंत्रिपद नाकारल्यानंतर त्यांची आता भाजप प्रदेशाध्यक्षपदासाठी चर्चा होत आहे. दरम्यान, भारतीय जनता पक्षाकडून चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी फोन आला होता. त्यांनी काल नागपुरात मंत्रिपदाची शपथ ग्रहण केल्याचे पाहायला मिळाले. या शपथविधीनंतर चंद्रशेखर बावनकुळे हे राज्यात मंत्री झाले आहेत. त्यामुळे चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून असणार याची चर्चा कालपासूनच राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. अशातच भाजप प्रदेशाध्यक्ष म्हणून रवींद्र चव्हाण यांच्यासह आता प्रवीण दरेकर यांचं नाव समोर आल्याने या पदासाठी शर्यत वाढली असून प्रदेशाध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळयात पडणार? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.



# भिवंडी महापालिकेचा २३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

१६ डिसेंबर २००१ रोजी भिवंडी महानगरपालिकेची स्थापना झाली असून २३ वर्षे पूर्ण झाल्याने महानगरपालिकेचा २३ वा वर्धापन दिन आयुक्त अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रम प्रसंगी महानगरपालिकेतील जे अधिकारी कर्मचारी यांनी अत्यंत चांगले प्रकारे आपली कर्तव्य व जबाबदारी पार पाडली आहे अशा अधिकारी कर्मचाऱ्यांना आयुक्त व मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त समाज कल्याण प्रणाली घोंगे, उपायुक्त शिक्षण अनुराधा बाबर, उपअभियंता बांधकाम सचिन नाईक,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बुशरा सय्यद,अंतर्गत लेखापरीक्षक नंदू चौधरी,विधी अधिकारी अनिल प्रधान,सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मिलिंद पळसुले, सहाय्यक आयुक्त सामान्य प्रशासन अजित महाडिक, सहाय्यक आयुक्त आरोग्य फैसल तातली ,मुख्य उद्यान अधीक्षक निलेश संखे, भविष्य निर्वाह निधी विभाग प्रमुख श्रीकांत परदेशी व आरोग्य अधिकारी जयवंत सोनवणे यांसह ५० अधिकारी कर्मचारी यांना प्रशस्ती पत्रक देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमात विशेष मार्गदर्शक म्हणून जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांना विशेष मार्गदर्शन करीत 'शहीद कॅप्टन विनायक गोरे' या एकपात्री अभिनय प्रयोगाच्या माध्यमातून उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना देशसेवा,समाजसेवा आणि दैनंदिन प्रशासकीय काम उत्कृष्ठ करण्याविषयी प्रोत्साहनात्मक, प्रबोधनात्मक सादरीकरण केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांना MOTIVATIONAL SPEAKER आणि विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमा प्रसंगी उपायुक्त मुख्यालय रोहिदास दोरकुळकर, उपायुक्त प्रणाली घोंगे, उपायुक्त डॉ अनुराधा बाबर, उपायुक्त शैलेश दोंदे, सहाय्यक संचालक नगर रचना अजय साबळे, मुख्या लेखापरीक्षक मयूर हिंगाणे,शहर अभियंता जमिल पटेल, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडेकर, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा संदीप पटनावर, मुख्य लेखा वित्त अधिकारी रामप्रसाद सोळुंके हे अधिकारी उपस्थित होते.




# ठाणे जिल्ह्यात बनावट औषधांची विक्री

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** जिल्ह्यातील भिवंडी शहरातून बनावट औषधांची रुग्णांना विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. औषध प्रशासनाने एक कोटी ८५ लाख रुपयांचा साठा जप्त केला असून ही औषधे अँटिबायोटिक (प्रतिजैविक) असल्याचे प्रशासनाने सांगितले. या प्रकरणी औषध प्रशासन विभागाकडून नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. आंतरराज्यीय टोळी यामध्ये सहभागी असून त्यादिशेने औषध प्रशासनाचा तपास सुरू आहे. गेल्या काही महिन्यांपासून बनावट औषधांप्रकरणी आतापर्यंत आठ गुन्हे दाखल झाले आहेत. या बनावट औषधांचा साठा सरकारी रुग्णालयांमध्येही विक्री झाल्याचे उघड झाले होते. भिवंडीमधील एका गोदामामध्येही बनावट औषधांचा साठा असल्याची माहिती औषध प्रशासनाला प्राप्त झाली होती. त्यानुसार औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या औषधांचा साठा विक्रीस प्रतिबंधित केला होता. या औषधांचे नमुने तपासल्यानंतर ते बनावट आढळून आले. त्यानंतर पथकाने एक कोटी ८५ लाख रुपयांच्या बनावट औषधांचा साठा जप्त केला. याप्रकरणात औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट औषधांची विक्री रुग्णांनाही झाली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय टोळी कार्यरत असून त्यादिशेने औषध प्रशासनाचा तपास सुरू आहे.

# मोठ्या मताधिक्याने पाचव्यांदा निवडून आलेले भाजपच्या किसन कथोरेंना यंदाही मंत्रिपदाची हुलकावणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ मुरबाड

बदलापूर : पाचव्यांदा मोठ्या मताधिक्याने आमदार म्हणून निवडून आलेले भाजपच्या किसन कथोरेंना यंदाही मंत्रिपदाने हुलकावणी दिली आहे. भाजपाच्या एका बड्या आणि जिल्ह्याचे पालकमंत्री भूषवलेल्या एका नेत्याने जोर लावून मंत्रिपदाची माळ आपल्या गळयात पाडून घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे किसन कथोरे यांचे यंदाही मंत्रिपद हुकल्याच्या जोरदार चर्चा जिल्ह्यात सुरू आहेत. पाच वेळेस आमदार आणि संपूर्ण जिल्ह्यात दांडगा जनसंपर्क अशा सर्व भक्कम बाजू असताना देखील कथोरेंना मंत्रिपद न मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये मोठी नाराजी पाहायला मिळत आहे. नागपूर येथे महायुती सरकारच्या नव्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांचा शपथविधी सोहळा नुकताच पार पडला. यावेळी महायुती मधील भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाच्या अनेक जुन्या आणि मातब्बर नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी भाजपकडून प्रामुख्याने अनेक जुन्या आणि ज्येष्ठ आमदारांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली. तर यावेळी ठाणे जिल्ह्यातून भाजपचे ज्येष्ठ आणि तब्बल पाच वेळेस आमदार राहिलेले किसन कथोरे यांना मंत्रिपद देण्यात येईल असे जवळपास निश्चित झाल्याचे बोलले जात होते. तर तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील किसन कथोरे यांचा योग्य सन्मान राखला जाईल असे वक्तव्य केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचारा दरम्यान किसन कथोरे यांच्या मंत्रीपदाबाबत वक्तव्य केले होते. यामुळे यंदाच्या महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात कथोरे यांचे स्थान निश्चित असल्याचे बोलले जात होते. किसन कथोरे हे सलग चार वेळेस मुरबाड विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले आहेत. तर एकदा अंबरनाथ विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी प्रतिनिधित्व केले आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा बँका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कथोरे यांची मजबूत पकड आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कथोरे यांचे वर्चस्व असल्याने त्यांचा समर्थक वर्गही मोठा आहे. त्यामुळे यंदा त्यांना मंत्रिपद मिळावे अशी मागणी देखील अनेक समर्थकांनी केली होती.

मात्र यंदाही त्यांना मंत्रिपदाने हुलकावणी दिली आहे. त्यामुळे याबाबत उघडपणे समर्थक बोलत नसले तरी समर्थकांमध्ये नाराजी पसरली आहे. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद मिळाल्यानंतर आणि महायुतीचे सरकार अडीच वर्षांपूर्वी पुन्हा स्थापन झाल्यानंतर ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री पदासाठी देखील किसन कथोरे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र त्यावेळीही कथोरे यांना संधी मिळाली नाही. एकनाथ शिंदे यांनी आपला बालेकिल्ला आपल्याच हाती ठेवण्यासाठी साताऱ्याचे शंभूराजे देसाई यांना जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नेमल्याने कथोरे यांचे मंत्रीपद तेव्हाही हुकले होते.



# तबल्याचा ताल हरपला झाकीर हुसेन यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याचा ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने सबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका समेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, अशा शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

महाराष्ट्राचा सुपुत्र असलेल्या झाकीर हुसेन यांनी अवघ्या जगाला तबल्याचे वेड लावले. तीन पिढ्यांसोबत तबल्याची जुगलबंदी सादर करणारे झाकीर हुसेन यांनी अनेक युवकांना तबला वादनाकडे आकर्षित केले. तबला क्षेत्रात भारताची वेगळी ओळख त्यांनी जगात निर्माण केली. तबला वादक पद्मविभूषण उस्ताद झाकिर हुसेन आणि तबला हे अद्वैत होते. हे अद्वैत आता भंगले आहे. जादुई बोटांनी त्यांनी स्वर मंडलात उभे केलेल्या अनेक अद्भुत मैफिली यापुढे तालयोगी तबलानवाझ उस्ताद झाकिर हुसेन यांच्याविना सुन्यासुन्या वाटत राहतील. वयाच्या सातव्या वर्षापासून तबलावादनाची सुरुवात करणाऱ्या उस्ताद झाकिर हुसेन यांनी तबलावादनातील एकल मैफिलींनाही प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीय संगीताला जागतिक पातळीवर सन्मान मिळवून देण्यात हुसेन यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे शिष्य जगभर संगीताची सेवा करत आहेत. वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा त्यांनी केवळ जोपासलाच नाही तर तबला वादनाला अत्युच्च अशा शिखरावर नेले. गाणारा तबला ही त्यांच्या जादुई बोटांची करामत अनेकांनी अनुभवली आहे. ज्येष्ठ कलाकारांबरोबर केलेली जुगलबंदी रसिकांसाठी पर्वणी होती. तरूण आणि होतकरू कलाकारांना व्यासपीठ मिळावे, त्यांची कला सादर व्हावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. तबल्याला समानार्थी नाव झाकीर हुसेन होते. साथीच्या या वाद्याला त्यांनी व्यासपीठाच्या केंद्रस्थानी आणून त्याला जनमनात स्थान मिळवून देण्याचे महान कार्य केले. त्यांच्या निधनाने भारतीय संगीताचा तेजस्वी तारा निखळला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या आणि चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# सर्वांच्या सहकार्याने जिल्हा संस्थेचा विकास करूया - देवदत्त शिंदे

## ठाणे भारत स्काउट आणि गाईड कार्यकारिणीची सभा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

ठाणे भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संस्थेच्या विकासासाठी मी सर्वतोपरी प्रयत्नशील राहुन योगदान देईल. या नवीन क्षेत्रात काम करत असल्यामुळे काम करताना आनंद होत आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने जिल्हा संस्थेचा विकास करूया असे नवनियुक्त सचिव देवदत्त शिंदे यांनी ठाणे भारत स्काऊट आणि गाईड्स जिल्हा संस्थेचे कार्यकारिणीचे सभेमध्ये मार्गदर्शन करताना सांगितले.



ठाणे भारत स्काऊट आणि गाईड्स जिल्हा संस्थेचे कार्यकारिणीची सभा शिक्षणाधिकारी (प्राथ ) बाळासाहेब राक्षे यांचे मार्गदर्शनाखाली ठाणे भारत स्काऊट आणि गाईड्स संस्था कार्यालय ठाणे येथे नवनियुक्त जिल्हा परिषद विस्ताराधिकारी सचिव देवदत्त शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. स्काऊट व गाईडचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल व लेडी बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेस शिंदे यांनी पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून सभेस सुरुवात केली.

प्रार्थनेनंतर नवनीयुक्त जिल्हा सचिव देवदत्त शिंदे यांचे स्वागत व सत्कार ज्येष्ठ जिल्हा मुख्यालय आयुक्त स्काऊट प्रकाश गुरूनानी आणि व सहा. जिल्हा आयुक्त सतीश कोल्हे यांनी केले.

सभेमध्ये विषय पत्रिकेनुसार जिल्हा संघटक गाईड हेमांगी पाटील यांनी सर्व विषयावर तपशीलवार चर्चा करून सुर्वानुमते विषयांना मंजुरी प्रदान करण्यात आली. या मध्ये इतिवृत्त, आर्थिक मंजुरी, जिल्हा मेळावा, प्रशिक्षण व सर्व आर्थिक बाबी सभागृहासमोर मांडण्यात आल्या. सर्व विषयावरील चर्चेत सहाय्यक जिल्हा आयुक्त सतीश कोल्हे, सहा जिल्हा आयुक्त रंणजीत शिंदे,जिल्हा प्रशिक्षण आयुक्त केशव चौधरी, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त पुष्पा जगताप, जिल्हा मुख्य आयुक्त जीवन मटके, सहा जिल्हा आयुक्त अर्जुन चेमटे, संध्या निकम, भाग्यश्री प्रभावळे, ममता मोराईस मॅडम, सतीश पोटोरे, पुष्प लता पाटील, सहाय्यक जिल्हा आयुक्त प्राजक्ता राऊत, महाजन सर्वांनी सहभाग घेतला.

जिल्हा संघटक किरण लहाने यांनी उपस्थिताचे आभार मानले. सभा यशस्वीतेसाठी लिपिक संदीप घुसिंगे, ज्योती इंगळे व सेवक शिवाजी पोर्टे यांनी परिश्रम घेतले.

# जगदंबा माता रहिवासी मंडळाच्या आयोजित स्पर्धेत बक्षिसांचा वर्षाव



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

जगदंबा माता रहिवासी मंडळ आयोजित सामाजिक कार्यकर्ते बाळा म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी महिलांसाठी होम मिनिस्टर, पुरुषांसाठी खुली स्पर्धा, लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा इत्यादी स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं.

रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडासा विरंगुळा मिळावा याकरिता वाढदिवसाच्या औचीत्याने रविवारी सांयकाळ पासू ते रात्री पर्यंत जगदंबा मंदिरासमोर लहानांपासून मोठ्यांना मनोरंजनात्मक मेजवानीचा आस्वाद घेता आला.

यावेळी महिलांसाठी आवडता असा होम मिनिस्टर, पुरुषांच्या खुल्या स्पर्धा तर लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये विजेत्या तसेच सहभागी स्पर्धकांवर बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला. एकूण ३०० बक्षिसे आयोजकांतर्फे देण्यात आली.

अशाप्रकारे पूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनात्मक खेळ स्पर्धा घेतल्याने नागरिकांना देखील रविवारची संध्याकाळ स्मरणीय ठरली. यावेळी विजेत्या आणि सहभागी स्पर्धकांना बाळा म्हात्रे, कविता म्हात्रे, अनमोल म्हात्रे आदींच्याहस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जगदंबा माता रहिवासी मंडळाचे अध्यक्ष निलेश साटम, कार्याध्यक्ष दिपक उतेकर, सचिव अमित गायकवाड, खजिनदार गुरुदास प्रभू, गौरव जानवळकर, एकनाथ कदम, शेखर परब, जितेंद्र चव्हाण आदींनी मेहनत घेतली.

# ठाणे व टिटवाळा येथे २८५ निरंकारी भक्तांचे उत्साहपूर्ण रक्तदान




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

मानवसेवेचे ब्रिद जपत संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवारी १५ डिसेंबर रोजी ठाणे आणि टिटवाळा येथे आयोजित केलेल्या दोन रक्तदान शिबिरांमध्ये एकूण २८५ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले.

ठाणे येथे २०९ युनिट रक्तदान ठाणे पूर्व कोपरी येथील महानगर पालिकेच्या शाळा क्रमांक ९ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरामध्ये एकूण २०९ निरंकारी भक्तगणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या शिबिरामध्ये संत निरंकारी रक्तपेढीने १५५ तर छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय रक्तपेढीने ५४ युनिट रक्त संकलन केले. संत निरंकारी मिशनच्या ठाण्यातील पाचपाखाडी आणि कोपरी ब्रँचमधील निरंकारी भक्तांनी या शिबिरामध्ये मोठ्या उत्साहाने भाग घेतला.


या रक्तदान शिबिराचे उदघाटन आमदार संजय केळकर यांच्याहस्ते करण्यात आले. तसेच या शिबिरामध्ये आमदार ॲड.निरंजन डावखरे, स्थानिक लोकप्रतिनिधी भरत चव्हाण, नारायण पवार, मालती पाटील, मनोज चव्हाण यांच्या सह संत निरंकारी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी ठाणे सेक्टर संयोजक डॉ.आर.एस. यादव, कोपरी ब्रांचचे मुखी रवींद्र मोहिते यांच्या देखरेखीखाली स्थानिक सेवादल अधिकारी व स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली.संत निरंकारी मिशनच्या डोंबिवली झोन अंतर्गत टिटवाळा येथील विद्या मंदिर शाळेमध्ये आयोजित रक्तदान शिबिरात ७६ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे रक्तदान केले ज्यामध्ये ६८ पुरुष तर ८ महिला रक्तदात्यांचा समावेश होता. जे.जे. महानगर रक्तपेढी मार्फत या शिबिरात रक्त संकलन करण्यात आले.

संत निरंकारी मंडळाचे डोंबिवली क्षेत्रीय प्रभारी रावसाहेब हसबे यांच्या या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे कल्याण सेक्टर संयोजक जगन्नाथ म्हात्रे, शिवसेना उपशहर प्रमुख विजय देशेकर, भाजपा विभाग अध्यक्ष प्रदीप भोईर यांच्या व्यतिरिक्त अनेक स्थानिक प्रबंधकगण आणि सेवादल अधिकारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मिशनच्या मानवतावादी कार्याचे कौतूक केले.

मांडा, टिटवाळा, मोहने, आंबिवली, अटाळी तसेच आसपासच्या भागातील निरंकारी भक्तांनी या शिबिरामध्ये भाग घेतला. स्थानिक मुखी खंडू धादवड यांनी सेवादल सदस्यांच्या सहयोगाने या शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन केले.

## फोर्टिस हॉस्पिटल कल्याणकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी

# हृदय व हाडांच्या आरोग्यावर जनजागृती शिबिराचे आयोजन




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

फोर्टिस हॉस्पिटल कल्याणने रोटरी क्लब ऑफ डोंबिवली आणि समन्वय सीनियर सिटीझन्स असोसिएशनसोबत सहयोगाने वृद्धांसाठी हृदय व हाडांच्या आरोग्यावर केंद्रित आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन केले होते. रोटरी क्लब, डोंबिवली येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये २०० हून अधिक उत्साही सहभागींनी उपस्थिती दाखवली. फोर्टिस हॉस्पिटल कल्याणमधील कन्सल्टण्ट-इंटरव्हेंशनल कार्डियोलॉजी डॉ. विवेक महाजन आणि कन्सल्टण्ट-ऑर्थोपेडिक्स डॉ. स्वप्नील केणी यांनी या शिबिराचे नेतृत्व केले. तसेच हृदयाचे आरोग्य व हाडांचे आरोग्य जतन करण्याबाबत आणि प्रतिबंधात्मक दृष्टिकोनासह लवकर लक्षणे ओळखण्याबाबत माहिती सांगितली.

डॉ. केणी यांनी आरोग्यदायी स्थितीत हाडांची घनता कायम राखण्यामध्ये संतुलित आहार व नियमित व्यायामाचे महत्त्व यावर भर दिला. ज्यामुळे संधिवात आणि फ्रॅक्चर्सची शक्यता कमी होऊ शकते. डॉ. महाजन यांनी वृद्धांना सामना करावा लागणाऱ्या हृदयाच्या आरोग्यसंबंधित समस्या, लवकर चेतावणी चिन्हे जसे श्वास घेण्यास त्रास होणे किंवा छातीत दुखणे आणि कार्डियोव्हॅस्कुलर सिस्टम तंदुरूस्त ठेवण्यासाठी जीवनशैली बदल यावर प्रकाश टाकला. उपस्थित सहभागींनी परस्परसंवाद साधला, शेअर करण्यात आलेल्या व्यावहारिक टिप्सचे कौतुक केले आणि तज्ज्ञांसोबत माहितीपूर्ण प्रश्नोत्तरे सत्रामध्ये सहभाग घेतला.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत फोर्टिस हॉस्पिटल कल्याणचे फॅसिलिटी डायरेक्टर मोहित वानखेडे म्हणाले, ''फोर्टिस हॉस्पिटल कल्याणमध्ये आम्ही वृद्ध लोकांच्या स्वास्थ्याप्रती कटिबद्ध आहोत. हे शिबिर आरोग्य व स्वास्थ्याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या आमच्या सुरू असलेल्या प्रयत्नांचा भाग आहे. संसाधने व माहिती देत आम्ही वृद्ध नागरिकांना लवकर निदान व वेळेवर हस्तक्षेपाच्या माध्यमातून त्यांच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो, तसेच त्यांना आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत करतो.''

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हा परिषद ठाणे येथे धरणे आंदोलन संपन्न

## दाभाड ग्रामपंचायतवर बरखास्तीची कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा सुभाष बसवेकर यांचा इशारा







**दै.ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)**

भिवंडी तालुक्यातील दाभाड ग्रामपंचायतने जाणीव पुर्वक कायदा नाकारुन दाभाड गावचे नागरिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे भिवंडी तालुका अध्यक्ष शांताराम पाटील यांना ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत बसण्यास मज्जाव केला होता.याविरोधात शांताराम पाटील यांनी गेल्या दोन वर्षांपासून प्रशासनाकडे पत्रव्यवहार करून सदर ग्रामपंचायतवर कारवाई करण्याची मागणी केली होती. परंतु ढिम्म प्रशासनाने कारवाई न करता उलट दोषींना आजपर्यंत पाठिशी घालण्याचे काम केले असल्याने अखेर माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक/अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या मार्गदर्शनाने,महासंघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर वडवले यांच्या नेतृत्वाखाली, १)दाभाड ग्रामपंचायत सरपंच व सदस्य मंडळ बरखास्त करावे. २) सबंधित ग्रामविकास अधिकाऱ्या स निलंबित करावे.३) या प्रकरणात दिरंगाई व दोषींना पाठिशी घालणारे पंचायत समिती व जिल्हा परिषद ठाणे चे अधिकारी यांच्यावर कारवाई करावी या प्रमुख मागण्यांचा आग्रह धरत शुक्रवार दि.१३/१२/२०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांच्या कार्यालयासमोर महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी धरणे आंदोलन केले.

या आंदोलनास महासंघाचे संस्थापक/अध्यक्ष सुभाष बसवेकर हे उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या संबोधनात 'आम्हाला हलक्यात घेऊ नका,जर दाभाड ग्रामपंचायतवर बरखास्तीची कारवाई झाली नाही तर मात्र हे आंदोलन अधिक तीव्र करुन प्रशासनाला जेरीस आणले जाईल असा गर्भित इशारा दिलेला आहे.

# 'बेस्ट' बसचे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना राबविणार

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**

मुंबईतील बेस्ट बसच्या अपघाताची घटना गंभीर असून राज्य शासनाने याची दखल घेतली आहे. अशा घटना घडू नयेत, यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



विधानपरिषदेत नियम २८९ अन्वये विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. श्री. फडणवीस म्हणाले की, 'बेस्ट' बसच्या अपघातातील वाहनचालकाची तपासणी केली आहे. या घटनेनंतर यादृच्छिक (रॅन्डम) पद्धतीने तपासणी करण्यास सुरूवात केली आहे. बेस्टमध्ये नवीन बसेस घेण्यासाठी १३०० बसेसची मागणी नोंदविण्यात आली असून त्या लवकरच बस 'बेस्ट'च्या ताफ्यात येणार आहेत. बेस्ट बसेसची वस्तुस्थिती जाणून घेऊन उपाययोजना राबविण्यासंदर्भात मुंबई महापालिका आयुक्तांना 'बेस्ट' प्रमुखांशी चर्चा करून आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या पीठासीन अधिकारी होत्या.




१७ डिसेंबर २०२४
मंगळवार

**मेष**
काही विशेष कामासाठी लांबचे प्रवास होऊ शकतात. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. तुम्हाला तुमच्या कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा सहकार्य मिळेल.

**वृषभ**
पैसे उधार देणे टाळा. नात्यात गोडवा राहील. नौकरीच्या ठिकाणी वरिष्ठांशी वाद संभवतात. नवीन काम करण्यासाठी दिवस कमजोर आहे.आजचा दिवस

**मिथुन**
व्यवसायासाठी हानिकारक असेल.आजचा दिवस तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयींकडे लक्ष देण्याचा दिवस असेल. कामात कोणताही बदल करू नका.

**कर्क**
राजकारणात काम करणाऱ्या लोकांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. प्रलंबित काम पूर्ण होईल.आजचा दिवस सावधगिरी बाळगा.

**सिंह**
चांगला जाणार आहे. कुटुंबीयांसह कुठेतरी बाहेर जाऊ शकता. कुटुंबात एखाद्याचे लग्न ठरतील. घरातील वातावरण आनंददायी राहील. घरातील

**कन्या**
अडचणींना सामोरे जावे लागेल. रागाच्या वागणुकीमुळे तुमचे मन अस्वस्थ राहील. शिक्षणात येणाऱ्या अडचणींबाबत शिक्षकांशी बोलून दाखवावे लागणार.

**तूळ**
समस्या उद्भवू शकतात. वादापासून दूर राहा. नौकरीच्या शोधात असलेल्या जातकांना आनंदाची बातमी मिळेल. आर्थिक परिस्थीची काळजी वाटेल.

**वृश्चिक**
वडिलधाऱ्यांशी वाद घालू नका. आज फसवणूक होऊ शकते.आजचा दिवस आनंदाचा जाणार आहे.आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा चांगली होईल. कायदेशीर

**धनु**
दिवस तुमच्यासाठी उत्साही असणार आहे. कुटुंबातील कोणत्याही सदस्याची तब्येत अचानक बिघडल्याने तुम्ही इकडे तिकडे धावपळ करण्यात व्यस्त असाल.

**मकर**
जुने मित्र भेटतील. प्रलंबित कामे पूर्ण होतील.आजचा दिवस संमिश्र परिणाम देणारा आहे. व्यवसायात नवीन काम सुरू करू शकता.

**कुंभ**
प्रकरणात विजय मिळेल आणि वाहन खरेदीचे तुमचे स्वप्न पूर्ण होईल, व्यक्तीच्या प्रभावाखाली कोणतीही मोठी गुंतवणूक करू नका.

**मीन**
कोणतेही नवीन काम सुरू केले असेल तर ते मध्येच थांबवावे लागेल. मुलांकडून तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते. दिवस तुमच्यासाठी संमिश्र असणार आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र व्हावा!

राज्यात भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट ) यांचे महायुती सरकार विक्रमी बहुमताने स्थापन झाले. आजवर कोणत्याच सरकारला मिळाले नाही इतके विक्रमी बहुमत या सरकारला महाराष्ट्रातील मतदारांनी दिले आहे.

या सरकारचा शपथविधी समारंभ नुकताच मोठ्या थाटामाटात पार पडला. माननीय देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर माननीय एकनाथ शिंदे व माननीय अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. ३९ आमदारांनी देखील नागपुरात मंत्रीपदाची शपथ घेतली.नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येताच सरकार ॲक्शन मोड मध्ये आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सर्व विभागाची बैठक घेऊन सचिवांना पुढील शंभर दिवसांचा कार्यक्रम आखण्यास सांगितले आहे.

जनातेच्याही या सरकारकडून खूप अपेक्षा आहेत. एक तरुण म्हणून मला तरुणांचे प्रश्न महत्वाचे वाटतात. नव्या सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करायला हवेत. कारण गेल्या चार पाच वर्षात राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाती काम नाही त्यात आर्थिक मंदी आणि कोरोणाने अनेक तरुणांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. सरकारी नोकरभरती बंद आहे. रोजगार नसल्याने राज्यातील तरुण नैराश्याच्या गर्तेत अडकला आहे. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढायचे असेल तर रोजगार निर्मितीसाठी सरकारने ठोस प्रयत्न करायला हवेत.

बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मुख्यमंत्र्यांनी नोकर भरतीचे आश्वासन दिले आहे ही आनंदाची बाब असली तरी ही नोकरभरती कंत्राटी नको तर कायम स्वरूपाची हवी. मागील सरकारने नोकर भरतीचे दिलेले आश्वासन हवेतच विरले. या सरकारने तरी नोकर भरतीचे दिलेले आश्वासन पूर्ण करावे.

राज्यातील ४० टक्के लोकसंख्या १८ ते ४५ या वयोगटातील आहे या तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतल्यास महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल यात शंका नाही. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मागील काळात महाराष्ट्रातील काही उद्योग गुजरातमध्ये गेल्याचे आपण पाहिले आहे आता तरी महाराष्ट्रातील उद्योग दुसऱ्या राज्यात जाणार नाही याची दक्षता सरकारने घ्यावी. उद्योगधंद्यात महाराष्ट्र देशात अव्वल क्रमांकावर ठेवण्याचे मोठे आव्हान या सरकारपुढे आहे. महाराष्ट्रात मोठे उद्योग आले तर रोजगारी कमी होऊन राज्याची अर्थव्यवस्था गतिमान होईल.

महायुती सरकारने जे विक्रमी बहुमत मिळवले आहे त्यात राज्यातील लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीला भरभरून मते दिली आता सरकारनेही लाडक्या बहिणींना विसरु नये. लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपयांचे आश्वासन पूर्ण करावे. त्यासोबतच महागाई करून दाजिंनाही दिलासा द्यावा. लाडक्या बहिणींच्या खात्यावर पैसे पाठवले म्हणजे सरकारचे काम संपले असे नाही तर लाडक्या बहिणींच्या संरक्षणाची जबाबदारी देखील सरकारने घ्यायला हवी. राज्यात महिला अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत.तीन वर्षाच्या चिमुरडी पासून साठ वर्षाच्या आजीपर्यंत सर्व वयोगटातील महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. सरकारने महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालून आणि नराधमांना कठोर शिक्षा द्यावी. मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले शक्ती विधेयक या सरकारने मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. मागील काही काळापासून राज्यातील शेतकरी सरकारी धोरणावर नाराज आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावेत. शेतकऱ्यांसोबत कष्टकरी, कामकरी आणि व्यापारी वर्गाचे देखील प्रश्न सरकारने प्राधान्याने सोडवावेत.

जनतेचा सर्वाधिक पैसा शिक्षण आणि आरोग्यावर खर्च होतो. या सरकारने जनतेचा शिक्षण आणि आरोग्यावर होणारा खर्च कमी करावा. राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि नागरिकांना निरोगी आरोग्य लाभेल या दृष्टीने सरकारने धोरणे आखावित. सरकारने सर्वांना परवडेल अशा माफक दरात आरोग्यसेवा पुरवावी. के जी ते पी जी शिक्षण मोफत करावे.

या सरकारने इंदु मिल मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील स्मारक तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांच्या कामाला गती द्यावी. या सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करावी. जलसिंचन, नदी जोड सारखे प्रकल्प राबवावेत.

सरकारने प्रशासनातील भ्रष्टाचार मोडून काढावा. राज्यातील स्त्रिया, मुलींना सुरक्षित वाटेल असे कायद्याचे राज्य स्थापन करावे. जाती - जातीत, धर्मा - धर्मात तणाव वाढत आहे. हा तणाव कमी करून राज्यात सौहार्दाचे वातावरण निर्माण करावे. एकूणच या सरकारने भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र निर्माण करावा.

**- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**

# दुबईत देखील दत्त जयंतीचा उत्साह



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
सातासमुद्रापार दुबईत यंदा प्रथमच श्री दत्त जयंती महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यंदा पूर्णवाद ग्लोबल ह्युमन फाउंडेशन आणि इंस्पायर इव्हेंटस तसेच दुबईतील विविध सामाजिक संघटना, कंपन्या, सांस्कृतिक मंडळे व मित्रपरिवार यांनी दुबई येथे प्रथमच भव्य श्री दत्त जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवा दरम्यान भव्य पालखी यात्रा काढण्यात आली ज्यात लहानथोर व वरिष्ठ मंडळींनी ही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. पालखी,पाळणा, पादुका पूजन,भजन संध्या व दत्त जन्म विषयक बाळ नाट्य या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले.

ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल दुबई येथे शनिवारी पालखी सोहळा आणि दत्त जयंती निम्मित प्राणप्रतिष्ठा झाली. त्यानंतर भजन व सामूहिक दत्त जाप, आरती, सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्य हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

श्री शेत्र पारनेर येथून आलेले पूर्णवादाचर्य आनंद मुठाळ यांचे दत्त देव की गुरु यावरील आभ्यास पूर्व चिंतन कार्यक्रमा चे मूळ आकर्षण ठरले. दुबईत यंदा प्रथमच दत्त जयंती महोत्सव हजारो भाविकानी एकत्र येऊन आपल्या दत्त गुरुंची सेवा करून एक वेगळा आदर्श संपूर्ण जागा समोर ठेवला.

कार्यक्रमाच्या आयोजना साठी चंद्रशेखर जाधव, पुष्पेंद्र सरोदे, प्रसाद मांडे, धनंजय सरोदे, महेश प्रधान, संजय पाटील, योगेश कराड, राजेंद्र गोळेगावकर, अतुल गायकवाड, ऋतुजा काळे, संतोष भस्मे, छगन पाटील, राजू बनसोडे या सर्वांच्या लाभलेल्या सहकार्यामुळे यंदा भव्य असा यशस्वी श्री दत्त उत्सव सातासमुद्रापार आयोजित केला गेला.

# १२४ गावातील एम.एम.आर.डी.ए बाधित शेतकऱ्यांनी संघर्षासाठी सज्ज व्हावे-राजेंद्र झेमसे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**
एम.म.आर.डी.एच्या नवनगरसाठी सक्तिचे संपादन लागू झाले आहे. तसा शासन आदेश देखिल निघाला आहे. १२४ गावांना NTDA लागू होवून आज महिना झाला तरी कोणिही mmrda बाधित शेतकरी एक्टीव मोडमध्ये येत नाही याचे कारण काय असावे? हे समजायला मार्ग नाही. mmrda विरोधात सुरवातीला धडपड करणाऱ्या कार्यकर्त्यांना शेतकऱ्यांची योग्य साथ मिळत नाही, किंवा mmrda ला विरोध करू शकणारे सक्षम संघटन उभे रहात नाही त्यामुळे सुरवातीला ही मंडळी संघर्षात जसे झोकून देवून काम करत होते ते लोक आता तितक्या जोमाने काम करतांना दिसत नाहीत. त्याच बरोबर सत्ताधारी पक्षाच्या सोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची व त्यांच्या सत्ताधारी नेते व पक्षाची mmrda विरोधांत कोणतीही स्पष्ट भुमिका दिसून येत नाही. तसेच स्थानिक नेतृत्व, गावोगावचे ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, पंस / जिप सदस्य कोणीही या सक्तिच्या संपादना विरोधांत बोलत नाहीत. काही मोजकी बोटावर मोजता येईल इतकी लोक सोडली तर आजी-माजी स्थानिक लोकप्रतिनिधी कोणीही या विषयांत संघर्षाची, लढण्याची भूमिका घ्यायला तयार नाहीत.

mmrda बाधित १२४ गावांतिल बाधित शेतकरी सक्तिच्या भुसंपादनाचा, शासन आदेश निघाल्यानंतर एक महिना उलटल्या नंतरही कोणतीही विरोधाची भुमिका घेत नाहीत याची नेमकी कारणे समोर येण्याची अवश्यकता आहे. mmrda साठी शेतजमिनी न देण्याचा लढा उभा होण्याची नितांत गरज असतांना बाधित शेतकरी अध्याप रस्त्यावर उतरायला तयार नाहीत याचा अर्थ बाधित शेतकरी आपल्या वडिलोपार्जित जमिनी mmrda साठी द्यायला तयार आहे असा काढला जावू शकतो. mmrda बाधित शेतकऱ्यांच्या हजारो हरकती mmrda कडे सपुर्द केल्यानंतरही या हरकतिचा कोणताही विचार न करता शासनाने मागच्या महिन्यांत १५ नोव्हेंबर रोजी NTDA जाहिर करून mmrda च्या नवनगरसाठी सक्तिचे भुसंपादन लागू केले आहे.

mmrda बाधित १२४ गावांतिल बराचसा शेतकारी व त्यांची मुलं सुशिक्षित आहेत, mmrda साठीचे सक्तिचे भुसंपादन कसे चुकिचे आहे हे समजण्या इतकी समज mmrda बाधित १२४ गावांतिल बहुतांश शेतकरी व त्यांच्या सुशिक्षित मुलामध्ये आहे. या सर्व सुशिक्षीतांनी mmrda कडून सक्तिच्या भुरूंपादनाच्या माध्यमांतून आपली सर्वांची फसवणूक कशी केली जात आहे, mmrda आपल्या जमिनी फुकटात लाटून भांडवलदार, व्यावसायीकांच्या घशात कशा प्रकारे घालणार आहे याची माहिती घेवून त्याचा अभ्यास करण्याची व हा शेतकऱ्यांचा विनाश करणारा प्रकल्प चुकिचा कसा आहे हे आपल्या सर्व बाधित शेतकऱ्यांना समजवून सांगण्याची अवश्यकता आहे. mmrda बाधित १२४ गावांतिल कोणा शेतकऱ्यांची मुलं वकिल, इंजिनीअर, उच्चशिक्षीत आहेत त्यांनी mmrda कायद्याचा व १२४ गावांत राबवला जाणारा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी धोकेदायक आणि घातक आहे किंवा कसे? याचा अभ्यास करून तो शेतकऱ्यांना समजवून सांगितला पाहिजे, सोबतच शेतकऱ्यांनी संघर्षाची भुमिका कशा पद्धतिने घेतली पाहिजे याचे देखिल मार्गदर्शन समाजातील सुशिक्षित-उच्चशिक्षीतांनी स्वताःहुन पुढे येवून समस्त शेतकरी वर्गाला केले पाहिजे. सुशिक्षित-उच्चशिक्षीतांच्या शिक्षणाचा त्यांच्या विद्वत्तेचा फायदा समाजाला होणार नसेल तर त्या शिक्षणाला तसाही काही अर्थ नाही.

mmrda बाधित शेतकरी संघर्ष करण्यासाठी सज्ज झाले नाहीत तर mmrda चा हा नवनगर प्रकल्प अक्षरशः रेटून नेला जाणार आहे. बाधित शेतकरी अजुनही जागृत होत नाहीत यामागे हा प्रकल्प नेमका काय आहे हे शेतकऱ्यांना अध्याप निटपणे समजले नसावे किंवा दुसरे कारण शेतकऱ्यांना mmrda च्या संपादनात जमिनीच्या मोबदल्यात प्रचंड पैसा शेतकऱ्यांना मिळणार आहे असे वाटत असावे, तसा गैरसमज जमिनींवर डोळा ठेवून असणाऱ्या काही जमिनीच्या एजंटांनी शेतकऱ्यांचा करून दिला असावा. खरंतर देशात २०१३ मध्ये भुसंपादन कायदा अस्तित्वात आला आहे व हा कायदा संपूर्ण देशाला लागू आहे. मात्र शासन mmrda साठी १२४ गावांच्या जमिनीचे सक्तिचे भुसंपादन करीत आहे ते या २०१३ च्या भुसंपादन कायद्याने न करता NTDA लागू करून mmrda च्या कायद्याने सक्तिने संपादन करून, शेतकऱ्यांना फसवून, इथल्या शेतकऱ्यांना देशोधडीला लावू पहात आहे. जमिनीचा मोबदला मिळतांना तो पैशाच्या स्वरूपांत मिळेल असे शेतकऱ्यांना वाटत असेल तर ते चुक ठरणार आहे. सरकार या प्रकल्पाच्या माध्यमांतून शेतकऱ्यांना कसे फसवता येईल याची व्युव्हरचना आखत आहे, त्यात सरकार अनेक पावलं पुढेही गेले आहे. सद्या नवि मुंबईत देखिल जमिन संपादन करतांना ती LAR (भुसंपादन कायदा २०१३)कायद्याखाली जमिन संपादन करणे अपेक्षित होते, त्याला बगल दिली जात आहे, तसे कुठेच घडतांना दिसत नाही. लोकांना कसे फसवायचे याचे मनसूबे सरकारने आखलेत. सरकारने आता जर शेतकऱ्यांची जागा संपादन केली व त्याच्या बदल्यात त्याना त्याच ठिकाणी जरी १५.७५ टक्के विकसीत जमीन भाड्याने जरी शेतकऱ्यांना दिली तरी त्याचा शेतकऱ्यांना फायदा काय ?, त्याचा काय मतलब किंवा त्याची काय व्हॅल्यू , आणि त्या दिलेल्या जागेचा शेतकऱ्यांना आज उपयोग तरी काय? ज्यावेळेला इथे डेवलपमेंट होणार तेंव्हा इथे त्या जागेचा उपयोग किंवा वापर होणार असेल तर आपल्याकडे आपल्या ताबेकब्जात असणारी आपली १००% मालकिची जमिन, आपल्या ताब्यातच राहिली तर काय हरकत आहे? त्या जमिनीचे सक्तिचे संपादन कशासाठी? हे संपादन LAR (भुसंपादन कायदा २०१३) कायद्या खाली होणार असते तर शेतकऱ्यांना त्याचा विचार करता आला असता. LAR (भुसंपादन कायदा २०१३) कायद्या प्रमाणे सरकारने बाजार भावाच्या चारपट किंमत शेतकऱ्यांना द्यायची आहे शिवाय या कायद्या प्रमाणे संपादित जमिनिच्या २०% जमिन सुद्धा शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला म्हणून शेतकऱ्याच्या मालकीत (भाड्याने नाही) परत द्यायची आहे. या कायद्याने किंवा अशा पद्धतिने जमिनीचे संपादन झाले असते, LAR (भुसंपादन कायदा २०१३) कायद्या प्रमाणे जमिनीची बाजार भावाच्या चारपट जमिनीची किंमत आज मिळाली असती व या कायद्या प्रमाणे मिळणाऱ्या २०% जमिनीचा वापर शेतकऱ्यांना या जमिनींचा विकास होत असताना करता आला असता, अशा प्रकारे संपादन झाले असते तर त्यात काही तरी लॉजिक आहे असे वाटले असते. मात्र आता ज्या पद्धतिने सरकार जमिन संपादन करू पहात आहे ते फक्त शेतकऱ्यांना फसवून फुकटात जमिनी लाटण्याचा सरकारचा प्रयत्न आहे आणि हा प्रयत्न आपल्या इथेच यशस्वी होवू शकतो असे कदाचित सरकारला वाटत असावे. देशभर तथा महाराष्ट्रात सरकार स्पेशल प्लॅनिंग ऑथरटी (SPA) म्हणून शेतकऱ्यांची मलकी मान्य करत आहे परंतु आपल्याकडे पेण-पनवेल-उरण या परिसरांतिल १२४ गावांना NTDA लागू करून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. नैनामध्ये शेतकऱ्यांना ४०% विकसीत जमिन परत दिली जात आहे किंवा दिली जाणार आहे मात्र mmrda च्या संपादनात मोबदला पैशाच्या स्वरूपांत मिळणार नाही. जमिनिच्या मोबदल्यात १५.७५ % टक्के विकसीत जमिन शेतकऱ्यांना दिली जाणार ही विकसीत जमिन कधी आणि कुठे देणार याबाबत कोणतीही स्पस्टता नाही. यावर शेतकऱ्यांनी स्वतः लक्ष घालून आपले नुकसान टाळण्यासाठी स्वतःहून संघर्षाची भुमिका घेण्याची अवश्यकता आहे. यासाठी तज्ञांना बोलवून मार्गदर्शन घेण्याची, mmrda चा नवनगर प्रकल्प आणि होवू घातलेले सक्तिचे भुसंपादन शेतकऱ्यांसाठी कसे घातक आहे हे सर्व बाधित शेतकऱ्यांनी समजून घेण्याची अवश्यकता असून, mmrda च्या नवनगर साठी जमिनी कोणत्याही शर्तीवर न देण्याची भुमिका घेवून मोठा लढा उभा करण्याची अवश्यकता आहे. अगदी हा लढा विरोधासाठी उभा राहू शकला नाही तरी किमान आपल्या शेतकऱ्यांची फसवणूक तरी होणार नाही यासाठी तरी हा संघर्ष उभा करण्याची अवश्यकता आहे. सर्व बाधित शेतकऱ्यांनी यावर तातडीने शेतकऱ्यांच्या, त्यांच्या पुढच्या पिढ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने फायद्याची ठरेल अशी योग्य भुमिका घ्यावी असे आवाहन वाशी खारेपाटातील जाणकार सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र झेमसे यांनी केले आहे.

# पारगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे भूमिपूजन

## नागरिकांच्या आरोग्य विषयक अडचणी सुटण्यास होणार मदत



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**पालघर(ऋषीकेश जाधव)**
सफाले जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम,आमदार विलास तरे, समाज कल्याण समिती सभापती मनीषा निमकर,सभापती शैला कोळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पालघर तालुक्यातील सफाळे पूर्व भागात असलेल्या पारगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.सभापती मनीषा निमकर,स्थानिक पंचायत समिती सदस्य कामिनी पाटील, तसेच ग्रामस्थ यांच्याकडून अनेक वर्षापासून प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी पाठपुरावा करण्यात आला असून गेल्या वर्षी पारगाव आरोग्य केंद्राला मंजुरी मिळाली होती.

त्या अनुषंगाने आज भूमिपूजनाचा कार्यक्रम करण्यात आला.

राष्ट्रीय आरोग्य अभियान पालघर येथील जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण पालघर यांनी प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा परिषद एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी पालघर यांच्या आदेशानुसार प्रशासकीय आरोग्य केंद्राला मंजुरी देण्यात आली आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्राला १ कोटी ४३ लाख रुपये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. हे उपकेंद्र सहा महिन्यात बांधण्यात येणार असून येत्या जून पर्यंत जनतेला याचा लाभ घेता येईल असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष चौधरी यांनी दिली. या प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय कक्ष, औषध निर्माण अधिकारी पक्ष, स्त्री कक्ष पुरुष कक्ष, लॅबोरेटरी, इमर्जन्सी कक्ष, कॅन्टीन, अशाप्रकारे इमारत उभी राहणार आहे. परिसरातील खेडेपाड्यातील नागरिकांना या आरोग्य केंद्राचा लाभ मिळणार आहे. पंचायत समिती सदस्य कामिनी पाटील, सरपंच अंकुश जाबर उपसरपंच, उपसरपंच वैभवी पाटील, ग्रामसेवक महेश किणी, पोलीस पाटील, डॉ. मनोज विश्वकर्मा, अमित सोनवणे,तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# सामाजिक कार्यकर्ते गणेश पाटील यांच्या राजकीय प्रवेशाची मागणी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
आपल्या कणखर वाणीने अन स्पष्टवक्तेपणामुळे समाजमाध्यमात तरणांच्या गळ्यातील ताईत बनलेले मर्चंट नेव्ही ऑफिसर गणेश पाटील यांच्या राजकीय प्रवेशाच्या मागणीसाठी वसईतील तरुणांनी त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. यांवर जनमत, सामाजिक आणि पारिवारिक मत घेऊन राजकीय प्रवेशाबद्दल निर्णय घेणार असल्याचे गणेश पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

गणेश पाटील समाज माध्यमातून समाजाचे अनेक प्रश्नांना वाचा फोडत असतात.



जेव्हा ते मायभुमीत परतात तेव्हा ते थेट आपल्या भुमिपुत्रांसाठी मैदानात उतरतात अशी त्यांची ओळख. इतकच नाही जग बदलायचं असेल तर स्वतःपासून सुरवात करायला हवा म्हणूनच गावातून त्यांनी सुरवात करीत गावातील तरुणांना एकत्र करुन गाव परिवर्तन संघर्ष समितीची स्थापना केली.लोकनेते दि बा

### जनमत, सामाजिक आणि पारिवारिक मत घेऊन निर्णय घेणार – गणेश पाटील

पाटील आंदोलनला पासून ते विविध आंदोलनात गणेश पाटील यांचा सहभाग आहे.अनेक तरुणांचे ते प्रेरणास्थान आहेत याच कारणांस्तव त्यांनी राजकारणात सक्रीय व्हावे अशी विविध भागातील तरुणांनी मागणी केली आहे.लवकरच याबाबतीत जनमत, सामाजिक आणि पारिवारिक मत घेऊनच राजकीय प्रवेश करू असे गणेश पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगीतले.

## केडीएमसीच्या वतीने

# करदात्यांसाठी अभय योजना

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांसाठी महानगर पालिकेने 'अभय योजना २०२४-२५' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना दोन 'टप्प्यांमध्ये' राबविण्यात येणार आहे.

यामध्ये दिनांक १४ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाची कराची व पाणीपट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यास १००इ शास्ती( दंड/ व्याज) माफ केले जाणार आहे. दिनांक १६ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५' या कालावधीत संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाची कराची व पाणीपट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम अधिक नियम ४१ खालील शास्ती (दंड/ व्याज) व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क २५% रक्कम एकरकमी भरल्यास ७५% शास्ती (दंड/ व्याज) माफ केली जाणार आहे.प्रभाग ई व आय मधील ग्रामपंचायत मिळकतींची बिले दुरुस्त करून देण्यात आलेली असून सदर मिळकतींना व्याज आकारलेले नसल्याने त्यांना अभय योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी सर्व मालमत्ता करदात्यांनी याचा लाभ घ्यावा व महापालिकेस सहकार्य करून विकासास हातभार लावावा असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# कोसल्यात श्रमदानातून बांधला वनराई बंधारा रब्बी पिकाच्या पाण्याचे नियोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण तालुक्यातील कोसले गावात नुकताच श्रमदानातून वनराई बांधरा बांधण्यात आला. डिसेंबर नंतर मार्च एप्रिल पर्यंत कोसले गाव परिसरात पाण्याची साठवणूक करण्याच्या दुष्टीकोनातून तसेच भूजल पातळी वाढण्यास मदत होण्यासाठी ओढ्यातून वाहत वाया जाणरे पाणी आढवून वनराई पध्दतीचा बांधरा श्रमदानातून बांधण्यात आला.

यामध्ये वनराई बंधारा बांधण्यासाठी सिमेंट च्या किंवा अन्य मोकळ्या गोण्याचा वापर करून त्यामध्ये वाळू भरून बांधारा बांधला जातो.



बहुतेक शेतकऱ्यांच्या शेती लगतच्या परिसरातून ओढा, नाला वाहत जात असतो. पावसाळा संपल्यावर पाण्याचा प्रवाह कमी झाल्यावर या ओढ्या,नाल्यावर वनराई बंधारे बांधणे शेतकऱ्यांना वरदान ठरतात. कोसले येथे दरवर्षी श्रमदान करून असे बंधारा बांधले जातात. कोसले येथील वनराई बांधर्यामुळे रब्बी पिकासाठी कडधान्य लागवड, भाजीपाला लागवड यासाठी व फळबाग लागवडीसाठी पाऊस संपल्यावर पाण्याची आवश्यकता असते. या पिकासाठी पाण्याचे नियोजन या वनराई बांधरामुळे झाले आहे.

वनराई बंधारा श्रमदानातून साकरण्यासाठी प्रसाद भोकरे(कृ.स), शेतीनिष्ठ शेतकरी श्रीराम पालवी , प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर चौधरी, सतीश पालवी, बळीराम कोळेकर, कविता पारधी(बचत गट) योगिता पारधी, यांनी श्रमदान केले.

वनराई बंधारे बांधावे यासाठी तालुका कृषी अधिकारी कल्याण यांच्या माध्यमातून प्रचार, जनजागृती केली जाते. यासाठी म. कृ. अ. भगवान पाथरे, कृ.प विजय पाटील हे श्रमदानातून वनराई बांधरे बांधण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात.

# अखेर मुरबाड बाजारपेठेने घेतला मोकळा श्वास



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(दिलीप पवार)**
मुरबाड नगरपंचायतीच्या स्थापने नंतर मुख्य बाजारपेठेतील तिन हात नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत रस्ता रूंदीकरण करून नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथ तयार केले गेले होते. मात्र रस्त्या लगतच्या गाळेधारकांनी व फेरीवाल्यांनी आपली दुकानेच फुटपाथवर थाटली असल्याने नागरिकांना फुटपाथ वरून चालणे अशक्य झाले होते. शिवाय छोटी मोठी वाहने रस्तावरच लावत असल्याने बाजारपेठेतील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. काही दुकानदारांची तर मोठी अरेरावी चालायची या विरोधात नगरपंचायत कडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नागरिकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत आज नगरपंचायत प्रशासनाने मुख्याधिकारी मनोज म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर स्थापत्य अभियंता परेश पवार यांच्या नेतृत्वाखाली नगरपंचायतच्या अतिक्रमण पथकाने आज फुटपाथ वरिल अतिक्रमणावर धडक कारवाई केली असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.यावेळी अतिक्रमण पथकाने काही व्यवसाईकांच्या हात गाड्या व इतर सामान सुद्धा ताब्यात घेण्यात आले आहे.

या कारवाईचे नागरिकां मध्ये समाधान व्यक्त होत असले तरी असे अनेक व्यवसायिक असे आहेत ज्यामध्ये भाजी विक्री करणार्या महिला ,फळविक्रेते , फेरिवाले की ज्यांचा उदरनिर्वाह यावरच चालत होता त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण होत असून नगरपंचायतने यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी पुढे येत आहे.

**''फुटपाथ वरिल अतिक्रमण संदर्भात अनेक तक्रारी नगरपंचायत प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या.गाळेधारकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असल्याने नागरिकांना चालणे कठिण होऊन गेले होते. याबाबत सर्वांना नोटीस देऊन फुटपाथ मोकळे करण्यास सांगितले होते . परंतु त्याला व्यवसायिकांनी प्रतिसाद न दिल्याने आज ही कारवाई करावी लागली''**
**- मनोज म्हसे , मुख्याधिकारी नगरपंचायत मुरबाड**

## जाहिर नोटीस
## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरबाड यांचे कार्यालय, मुरबाड

**प्रति,**
**१) श्री. राजाराम यशवंत बांगर, राहणार भुवन, ता. मुरबाड, जि.ठाणे,...अर्जदार**
**विरुद्ध**
**२) ग्रामपंचायत भुवन, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, ता. मुरबाड,जि.ठाणे,...सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे..

१. उपरोक्त अर्जदार यांचे वडील कै.यशवंत आबाजी बांगर यांचा मृत्यू दिनांक ३०/०५/१९९८ रोजी राहत्या घरी मु. भुवन, ता. मुरबाड, जि.ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/मृत्यूची नोंद निबंधक, जन्म/मृत्यू नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी जन्म/ मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा.तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ८३७ दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या वडीलांचा जन्म/मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे १२/१२/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

**हुकमावरुन**
**(श्रीम. सुषमा अव्हाड- बांगर)**
**निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**

**जा.क्र.फौंजदारी/जन्म मृत्यु नोंद/कावि ५१९/२०२४**

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
### भिवंडी.जि.ठाणे.
### वैद्यकिय आरोग्य विभाग
**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान १५ वा वित्त आयोग**

### जाहीर ई निविदा सुचना क्र. ०१

खालील कामे करण्याकरीता सक्षम व अनुभवी निविदाकाराकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| ई-निविदा सुचना क्र.०१/ई-निविदा फी/ कामाचे स्वरुप | ई निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख |
|---|---|
| वैआवि/ई-नि.क्र.०१/२०२४-२५/रु.१८८८०/- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग अंतर्गत एकुण २२ नागरी आयुष्मान आरोग्य मंदीर (UHWCs) Porta Cabin मध्ये उभारणेकरीता एकुण २२ Porta Cabin खरेदी करणे बाबत. | दि.३१/१२/२०२४ सायं.३.००वा.पर्यंत |

सदर ई निविदा मनपाच्या संकेतस्थळ bnmc.maharashtra.etender.in वर दि.१७/१२/२०२४ पासुन उपलब्ध आहेत. आपल्या ई निविदा वर नमुद केलेल्या तारखेच्या १५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात याव्यात.

**सही /-**
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**जा.क्र./जसंवि/१५९०**
**दि.१६/१२/२०२४**

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
### कर निर्धारण व संकलन विभाग
**शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) ४२१३०१**

### जाहीर आवाहन

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांसाठी महानगरपालिकेने 'अभय योजना- २०२४-२५' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीवरील व्याजमाफीची योजना खालील प्रमाणे आहे.

**'अभय योजना-२०२४-२५'**

**नियम ४१ खालील शास्ती (दंड/व्याज) व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क माफीचा तपशिल**

| अ.क्र. | कालावधी | जमा करावयाच्या रक्कमेचा तपशिल | नियम ४१ खालील शास्ती (दंड/व्याज) व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क माफीचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १४ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ | संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाचे कराची व पाणी पट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यास | १०० टक्के |
| २. | १६ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ | संपूर्ण धकबाकीसह चालू वर्षाचे कराची व पाणी पट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम अधिक नियम ४१ खालील शास्ती (दंड/व्याज) व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क २५ टक्के रक्कम एकरकमी भरल्यास | ७५ टक्के |

तरी सर्व थकीत मालमत्ता करदात्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा व महापालिकेस सहकार्य करावे.

**सही /-**
**(डॉ. इंदुरराणी जाखड) भा.प्र.से**
**आयुक्त,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१९३७**
**दि.१६/१२/२०२४**

# पोलिस अंमलदार संजय घुडे राज्य पुरस्काराने सन्मानित




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**
प्रेरणा फाउंडेशन व प्रेरणा रंगमंच नाट्य मंडळ महाराष्ट्र यांच्या वतीने २०२४ दिला जाणारा राज्य पुरस्कार हा,महामार्ग पोलीस सेवेत असलेले ठाणे परिक्षेत्रातील म.पो. केंद्र माळशेज येथील पोलीस अंमलदार संजय घुडे यांना प्रदान करण्यात आला आहे. संजय घुडे हे आपल्या नोकरी व्यतिरिक्त इतरही सामाजिक कार्य करत असतात. भजन, प्रवचनाच्या माध्यमातून जनजागृती. प्राणीमात्रांना मदत करणे, असाय पीडित यांना मदत करणे हे त्यांचे ध्येय आहे. व्यक्ती स्वतःसाठी तर जगतोच परंतु इतरांना जेव्हा मदत करतो त्यातच खरी मानवता दडलेली आहे, आणि हेच त्यांच्या जीवनाचे सार आहे. त्यांना मिळालेल्या राज्य पुरस्काराने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आ. सुलभा गायकवाडांच्या पाठपुराव्याला अखेर यश




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण डोंबिवली महानगर पालिका आयुक्त माननीय इंदुराणी जाखड यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांसाठी महानगरपालिकेने अभय योजना राबवावी अशा आशयाचे निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेऊन कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रातील करदात्यांसाठी महानगर पालिकेने 'अभय योजना २०२४- २५' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.सदर योजना ही दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. यामध्ये दिनांक १४ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाची कराची व पाणीपट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम एकरक्कमी भरल्यास १००% ( दंड/ व्याज) माफ केले जाणार आहे व दिनांक १६ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाची कराची व पाणीपट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम एकरक्कमी भरल्यास ७५ % (दंड/ व्याज) माफ केले जाणार आहे.तरी सर्व मालमत्ता करदात्यांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.ही योजना तातडीने लागू करून सर्वसामान्यांना दिलासा दिल्याबद्दल कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त माननीय इंदुराणी जाखड यांच्या या निर्णयाचे स्वागत आणि त्यांचे मनःपूर्वक आभार.

# जवाहर नवोदय विद्यालयासाठी १८ जानेवारी रोजी प्रवेश परीक्षा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**रायगड(प्रतिनिधी) :**
निजामपूर ता.माणगाव येथील पीएमसी स्कूल जवाहर नवोदय विद्यालयाची इयत्ता सहावी साठी प्रवेश परीक्षा १८ जानेवारी २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यातील परीक्षा केंद्रावर होणार आहे. त्यासाठीचे प्रवेश पत्र https://cbseitms.rcil.gov.in/nvs/AdminCard/AdminCard व https://navodaya.gov.in वेबसाईटवरून संबंधित उमेदवारांनी डाउनलोड करून घ्यावेत अशी माहिती विद्याल याचे प्रभारी प्राचार्य मनोज राऊत यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील परीक्षा केंद्रावर एकूण २ हजार ३७४ विद्यार्थी यावेळी इयत्ता सहावी वर्ग पात्रता परीक्षेसाठी बसत आहेत. एकूण ८० जागांसाठी यातून विद्यार्थी निवडले जाणार असून परीक्षा पात्र विद्यार्थ्यांची नावे आणि त्यांच्या रजिस्ट्रेशन क्रमांक परीक्षा ओळखपत्रे या https://cbseitms.rcil.gov.in/nvs/AdminCard/AdminCard ke https:// navodaya.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

विद्यार्थी रजिस्ट्रेशन क्रमांक आणि विद्यार्थी जन्मतारीख हे ओळखपत्राचे पासवर्ड असणार आहेत सर्व परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. विद्यार्थी आणि पालकांना याबाबत काही माहिती हवी असेल तर त्यांनी संतोष चिंचकर ९८८१३५१६०१ ,अर्जुन गायकवाड ९८६२७९३६४०, वर्षा सावंत ७२७६००८३९९ यांना संपर्क साधावा.

# खड्ड्यात पडून मुलाचा मृत्यू

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**नवी मुंबई(प्रतिनिधी) :**
कोपरखैरणे सेक्टर पाच येथे एका इमारतीसाठी खणलेल्या खड्ड्यात पडून ९ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्यानंतर मनपा प्रशासन खडबडून जागे झाले आहे. पोलीस आणि मनपा प्रशासनाला या इमारतीच्या विकासकाचे नावही माहिती नसल्याचे उघड झाले आहे. हे बांधकाम अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. दरम्यान, बुधवारी रात्री उशिरा या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंकित ठनूगा , वय वर्ष ९ असे मृत विद्यार्थ्यांचे नाव आहे. सेक्टर ५ मध्ये हे इमारत बांधकाम सुरू होते. या ठिकाणी खणलेल्या खड्ड्यातील पाण्यात पडून त्याचा मृत्यू झाला. ज्या ठिकाणी घटना घडली त्यापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टीत तो राहत होता. घरात एकुलता एक असल्याने या घटनेने केवळ कुटुंबीयच नव्हे तर परिसरातील नागरिक सुन्न झाले आहेत. मुलाचा मृत्यू ही घटना बुधवारी संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास उघडकीस आली.

### परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी या भीमसैनिकाच्या हत्येप्रकरणी
# डोंबिवलीत रिपब्लिकन सेनेचा रास्ता रोको

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ डोंबिवली(प्रतिनिधी) :**
रिपब्लिकन सेनेतर्फे महाराष्ट्र बंद ची हाक पुकारण्यात आली होती. डोंबिवली मध्ये याच मागण्या घेऊन रिपब्लिकन सेनेने भव्य मोर्चा काढत पूर्व आणि पश्चिम चे मार्केट बंद केले.या आक्रोश मोर्चाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळा,जुने विष्णुनगर पोलीस स्टेशन,डोंबिवली (प) येथून करण्यात आली, सदर आक्रोश मोर्चा स्टेशन परिसरातून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाकडे जात असताना रिक्षा चालक मालकांनी तसेच दुकानदारांनी स्वतःहुन आपले व्यवसाय बंद करीत बंद मध्ये सहभाग नोंदवला.दिनदयाळ चौक डोंबिवली प येथे सुमारे अर्धा तास रास्ता रोको करण्यात आले.

पूर्व पश्चिमच्या रेल्वे ब्रिजवरून हा मोर्चा आगेकूच करीत केळकर रोडवरून पोहोचल्यानंतर कामगार नाका चौकात रास्ता रोको करीत ठिय्या आंदोलन करण्यात आले.त्यानंतर इंदिरा चौकातील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयासमोर







तीव्र निदर्शने करीत सुमारे तासभर भारतीय संविधानाचा आणि महापुरुषांच्या जयघोषांचा गजर करीत सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळणेकरिता सरकारच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करून सहाय्यक पोलीस आयुक्त मा.सुहास नेमाडे सर यांना तमाम कार्यकर्त्यांतर्फे मोर्चाचे निवेदन सादर करण्यात आले.रिपब्लिकन सेनेच्या या आंदोलनात पोलीस प्रशासनाकडून प्रचंड फौजफाटा बंदोबस्त लावण्यात आला होता.या मोर्चाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष तथा ठाणे जिल्हा निमंत्रक (पँथर) आनंद नवसागरे यांनी केले.

मोर्चा यशस्वी होनेकरिता रिपब्लिकन सेना महिला अध्यक्ष सुरेखाताई जाधव,राहुलभाऊ नवसागरे (डोंबिवली विधानसभा अध्यक्ष), जया कदम (डोंबिवली महिला उपाध्यक्ष),सुभाष शिरसाट(कल्याण डोंबिवली युवा नेते),संदीप हेरोडे(आय टी सेल प्रमुख),युवराज वाटूरे(डोंबिवली शहर संघटक),रमेश ढगे(शहर सचिव),युवा कार्यकर्ते देवानंद खिल्लारे,सुरेश सावंत,किरण वाटाणे,आदींनी विशेष परिश्रम घेतले.

या आंदोलनास रिपब्लिकन युवा सेना,रिपब्लिकन रिक्षा चालक मालक वाहतूक सेना,रिपब्लिकन युवा सेना,महिला आघाडी तर्फे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आंबेडकर) गटाच्या वतीनेही जैष्ठ नेते मिलिंद वानखेडे,मंगेश जाधव,सुमित कनकुटे यांच्या नेतृत्वाखाली इंदिरा चौक डोंबिवली पूर्व येथे भव्य निदर्शने आयोजित केली होती.मोर्चा समारोपावेळी आर पी आय आठवले गटाचे ठाणे जिल्हा उपाध्यक्ष माणिक उघडे,गवई गटाचे अमित बनसोडे ठाणे जिल्हा प्रभारी,जिल्हा सचिव अनिल खैरनार यांनी हजेरी लावत मोर्चास समर्थन दिले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी